IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# आधुनिक संस्कृत लेखकांचे स्त्रीविषयक दृष्टिकोन: एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. (डॉ.) मृणालिनी आबासाहेब शिंदे**
संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*आधुनिक संस्कृत साहित्य, संस्कृत लेखक, स्त्रीविषयक दृष्टिकोन, स्त्रीवादी विचार, सामाजिक जागरूकता, समाजपरिवर्तन, चिकित्सक अभ्यास,*

**ABSTRACT**

आधुनिक काळातील सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक परिवर्तनामुळे भारतीय समाजातील स्त्रीच्या स्थानाविषयी नवजाणीवा विकसित झाल्या आहेत. या परिवर्तनांचे प्रभावी प्रतिबिंब आधुनिक संस्कृत साहित्यात पडलेले आढळते. पारंपरिक साहित्यात स्त्रीचे चित्रण प्रामुख्याने त्याग, सौंदर्य व आज्ञाधारकतेच्या चौकटीत मर्यादित असले, तरी आधुनिक संस्कृत लेखकांनी स्त्रीला स्वतंत्र, सुशिक्षित, आत्मभान असलेली व सामाजिकदृष्ट्या सक्रिय व्यक्ती म्हणून रेखाटले आहे. वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतींच्या आधारे स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री–पुरुषसमानता आणि सामाजिक न्याय या संकल्पनांचे साहित्यिक प्रतिबिंब तपासले आहे.आधुनिक संस्कृत लेखकांच्या निवडक साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास करून स्त्रीविषयक दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

या अभ्यासातून आधुनिक संस्कृत साहित्य स्त्रीविषयक प्रगत व मानवतावादी दृष्टिकोन घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, असे स्पष्ट होते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shinde, M. A. (2025). आधुनिक संस्कृत लेखकांचे स्त्रीविषयक दृष्टिकोन : एक चिकित्सक अभ्यास. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 827–833.

**प्रस्तावना-**

संस्कृत साहित्य ही भारतीय संस्कृतीची गौरवशाली अशी समृद्ध साहित्यपरंपरा आहे. वेद, उपनिषदे, महाकाव्ये, नाटके यांमधून भारतीय समाजजीवनाचे विविध पैलू प्रतिबिंबित झालेले दिसतात. या संपूर्ण साहित्यपरंपरेत स्त्रीचे स्थान नेहमीच महत्त्वाचे राहिले असले, तरी तिचे स्वरूप आणि सामाजिक भूमिका काळानुरूप बदलत गेली आहे.

प्राचीन संस्कृत साहित्यात स्त्री ही प्रामुख्याने माता, पत्नी, सहधर्मचारिणी किंवा त्यागमूर्ती अशा आदर्श प्रतिमांत साकारलेली आहे. सीता, सावित्री, शकुंतला, दमयंती यांसारख्या स्त्रीप्रतिमा नैतिकता, सहनशीलता व पतिव्रताधर्म यांचे प्रतीक मानल्या गेल्या. पण या चित्रणामध्ये स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक स्वातंत्र्य मर्यादित स्वरूपात आढळते.

आधुनिक काळात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व वैचारिक परिवर्तनामुळे स्त्रीच्या जीवनात आमूलाग्र बदल झाले. स्त्रीविषयक जाणीवा अधिक व्यापक झाल्या व स्त्रीविषयक विचारधारा नव्याने आकार घेऊ लागल्या. स्त्रीशिक्षण, समाजसुधारक चळवळी, मानवी हक्कांची जाणीव आणि स्त्रीवादी विचारसरणी यांचा प्रभाव आधुनिक संस्कृत साहित्यावरही पडला. त्यामुळे आधुनिक संस्कृत लेखकांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. स्त्री ही आता केवळ सहनशील किंवा त्यागशील न राहता, विचारशील, स्वाभिमानी आणि परिवर्तनाची वाहक म्हणून साहित्यात प्रकट झाली.

या शोधनिबंधाचा उद्देश आधुनिक संस्कृत लेखकांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा चिकित्सक अभ्यास करणे हा आहे.

**उद्दिष्ट्ये-**

१. आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्रीप्रतिमेचे स्वरूप स्पष्ट करणे.
२. आधुनिक संस्कृत लेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अभ्यासणे.
३. पारंपरिक व आधुनिक स्त्रीप्रतिमेतील बदल अधोरेखित करणे.
४. आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्रीविषयक समस्यांचे विश्लेषण करणे.
५. स्त्रीप्रतिमेचे चिकित्सक मूल्यमापन करणे.

**व्याप्ती-**

प्रस्तुत विषयाची व्याप्ती आधुनिक संस्कृत साहित्य एवं साहित्यकार, अर्वाचीन संस्कृत साहित्य, कुमार्यम्बा, संस्कृत चंद्रिका, ललित संस्कृत साहित्याला महाराष्ट्राचे योगदान या ग्रंथांपुरतीच मर्यादित आहे.

**महत्त्व-**

आधुनिक संस्कृत लेखकांचे स्त्रीविषयक दृष्टिकोन अभ्यासल्याने स्त्रीची बदलती सामाजिक व वैचारिक प्रतिमा स्पष्ट होते. या अभ्यासातून संस्कृत साहित्याची समाजाभिमुख बाजू कळते.परंपरा आणि आधुनिकता यांतील समन्वय समजून घेण्यास मदत होते. आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्री-अधिकार, समता व सक्षमीकरण यांचे प्रतिबिंब अधोरेखित होते. म्हणून प्रस्तुत विषय निवडलेला आहे.

**संशोधनपद्धती-**

प्रस्तुत विषयाची संशोधन पद्धती वर्णनात्मक व विश्लेषणात्मक आहे. प्राथमिक स्रोत म्हणून आधुनिक

संस्कृत काव्य, नाटक व कथासाहित्य यांचा अभ्यास केला आहे. दुय्यम स्रोत म्हणून समीक्षात्मक ग्रंथ, संशोधन लेख, प्रबंधांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषयविवेचन-**

**आधुनिक संस्कृत साहित्य : स्वरुप व वैशिष्ट्ये-**

आधुनिक संस्कृत साहित्याचा विकास प्रामुख्याने १९ व्या शतकानंतर झालेला दिसतो.[१] या साहित्यात समकालीन सामाजिक प्रश्न, मानवीमूल्ये, राष्ट्रभावना आणि मानवतावादी दृष्टीकोन पहावयास मिळतो. स्त्रीविषयक प्रश्न हे या साहित्याचे महत्त्वाचे अंग असून, स्त्रीच्या सामाजिक, शैक्षणिक व मानसिक स्थितीचा सखोल विचार येथे करण्यात आलेला आहे.

**पारंपरिक संस्कृत साहित्यातील स्त्रीविषयक दृष्टिकोन-**

अभिजात संस्कृत साहित्यात स्त्री ही प्रामुख्याने आदर्श मूल्यांची वाहक म्हणून चित्रित झाली आहे. वैदिक व उपनिषदकालीन साहित्यात स्त्रीला बौद्धिक व वैचारिक स्थान प्राप्त होते. वैदिक काळात(ऋग्वेदात) घोषा, गोधा, विश्ववारा, अपाला, अदिती, इन्द्राणी, रोमशा, लोपामुद्रा, दक्षिणा यांसारख्या ब्रह्मवादिनींचा उल्लेख आढळतो.[२] उपनिषदकाळात स्त्री बौद्धिक चर्चेत सहभागी होती.[३] रामायणातील सीता त्याग व पावित्र्याचे प्रतीक आहे, तर महाभारतातील द्रौपदी धर्म आणि न्यायाची साक्ष देते. कालिदासाच्या नायिका सौंदर्य, लज्जा व कोमल भावनांचे प्रतीक आहेत.या प्रतिमांमध्ये स्त्रीचे महत्त्व मान्य असले, तरी तिचे स्वातंत्र्य मर्यादित असल्याचे दिसते. स्मृतिग्रंथ व मध्ययुगीन काळात सामाजिक संरचनेतील बदलांमुळे स्त्रीचे स्थान मर्यादित झाले. या पार्श्वभूमीवर आधुनिक संस्कृत लेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अधिक व्यापक व परिवर्तनशील ठरतो.

**आधुनिक काळातील सामाजिक परिवर्तन-**

आधुनिक युगात स्त्रीशिक्षणाचा प्रसार, स्त्रीसुधारणा चळवळी, विधवाविवाह, स्त्रीहक्क यांसारख्या सामाजिक बदलांनी स्त्रीच्या जीवनाला नवी दिशा दिली. या बदलांचा प्रभाव आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्रीप्रतिमांवर स्पष्टपणे जाणवतो.

**आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्रीप्रतिमा-**

आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्री ही केवळ त्यागमूर्ती, करुणामूर्ती आणि सौंदर्याचे प्रतीक नसून आत्मभान असलेली, सामाजिक अन्यायाला प्रश्न विचारणारी, शिक्षित व स्वतंत्र विचार करणारी, निर्णयक्षम व स्वाभिमानी अशा स्वरूपात साकारलेली दिसते. उदा. महालिंगशास्त्री यांचे 'पल्लीशाला- प्रहसनम्'[४] ही स्त्री परंपरेचा सन्मान राखते; परंतु अंधपरंपरांना विरोध करते. ती विचारशील, संघर्षशील, निर्णयक्षम व आत्मसन्मान जपणारी व्यक्ती म्हणून उभी राहते. उदा. स्वातंत्र्यसम्भवम्[५] आधुनिक लेखकांनी स्त्रीच्या मानसिक संघर्षांचे, सामाजिक अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे आणि आत्मभानाचे वास्तववादी चित्रण रेखटलेले आहे. उदा. राजेंद्र मिश्र यांचे कथासंग्रह 'रांगडा, पुनर्नवा'.[६]

**आधुनिक संस्कृत लेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन-**

**स्त्रीशिक्षण-**

आधुनिक संस्कृत लेखकांनी स्त्रीशिक्षणाला सामाजिक प्रगतीचे महत्त्वपूर्ण साधन मानले आहे. शिक्षित स्त्री ही समाजपरिवर्तनाची वाहक ठरते, असे चित्रण आढळते. शिक्षणामुळे स्त्री आत्मनिर्भर, विवेकशील व

सामाजिकदृष्ट्या सक्षम होते, असा विचार त्यांच्या साहित्यकृतींमधून प्रकट होतो. शिक्षणामुळे स्त्री जागरूक व स्वाभिमानी बनते, असा दृष्टिकोन त्यांच्या लेखनात दिसतो. शिक्षित स्त्री ही कुटुंबापुरती मर्यादित न राहता समाजपरिवर्तनात सक्रिय सहभाग घेते, असे चित्रण येथे आढळते. या साहित्यात आधुनिक जीवनदृष्टी, सामाजिक प्रश्न, स्त्री-पुरुष समानता, राष्ट्रभावना व मानवतावाद यांचा प्रभाव दिसून येतो. उदा. श्री. यज्ञेश्वर शास्त्री यांचे राष्ट्ररत्नम् मुक्तककाव्य.[७] आधुनिक संस्कृत लेखकांनी स्त्रीशिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आहे. उदा. भट्ट मथुरानाथ शास्त्री, मंजुनाथ यांचे 'मंजुला'' सामाजिक नाटक.[८]

काह्वयत रिपूनुदग्रान् | एकलापि पुनस्समग्रान् |
वाहयेच्चलचन्द्रहासै रक्तशतसरितो निमेषे|| क्वास्ययये झांशीनरेशे ||
हुङ्कृतौ तव सिन्धुघोषः | नयनयोः रुद्ररोषः |
कालिकेव बभूव मूर्तिस्तेजसा ते रणनिवेशे || क्वास्ययये झांशीनरेशे ||[९]

आधुनिक संस्कृत साहित्यामध्ये स्त्रीस्वातंत्र्याचा विचार ठळकपणे मांडलेला आहे. विवाह, शिक्षण, व्यवसाय आणि सामाजिक सहभाग या बाबींमध्ये स्त्रीला निर्णयस्वातंत्र्य असावे, असा आग्रह लेखकांनी धरलेला दिसतो. तसेच स्त्रीच्या आत्मसन्मानावर भर देण्यात आला आहे. उदा. क्षमदेवीरचित संस्कृतकथा. 'निशीथबलिः[१०] या कथेत स्वातंत्र्यासाठी एक बुरखादारी यवन तरुणी धाडसीपणाने झगडत असल्याचे पहावयास मिळते.

**स्त्री–पुरुष समानता-**

आधुनिक संस्कृत लेखकांनी स्त्री–पुरुष समानतेचा विचार मानवतावादी दृष्टिकोनातून मांडला आहे. स्त्री व पुरुष हे सामाजिक, बौद्धिक व नैतिकदृष्ट्या समान असून, समान अधिकार व कर्तव्य असलेली स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे आहेत, हा विचार साहित्यकृतींमधून अधोरेखित होतो. ही समानतावादी भूमिका आधुनिक संस्कृत साहित्यातील प्रगत दृष्टीकोन दर्शविते. उदा. आदर्शं पितुरनुसृत्य साथ बाला भालस्थं खलु विदधे व्रतं तदीयं | स्वातंत्र्यं भजति न मातृभूस्तु यावत् तावन्नोपयमकथेति निर्णयन्ती ||[११]

**स्त्रीविषयक सामाजिक समस्या-**

आधुनिक संस्कृत लेखकांनी स्त्रीजीवनाशी निगडित विविध सामाजिक समस्यांकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले आहे. परित्यक्ता, बालविवाह, हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या, विधवांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसा, लैंगिक शोषण व सामाजिक असमानता यांसारख्या विषयांचे प्रभावी चित्रण त्यांच्या साहित्यकृतींमध्ये आढळते. उदा. विश्वेश्वर दयाळ यांची 'यौतकम्' कथा, पी. व्ही. वरदराज शर्मा यांचे 'कस्याहम्' एकपात्री आधुनिक नववधूचे हृदगत.[१२] या समस्यांचे विवेचन करताना लेखक केवळ सहानुभूती न दाखवता समाजप्रबोधनाची भूमिका घेताना दिसतात. डॉ. श्री. भा. वर्णेकर यांची 'अन्नपूर्णा' ही परित्यक्तेची कथा.[१३] पं. क्षमा राव यांच्या कथामुक्तावलीमधील विधवेची व्यथा कथन करणारी 'विधवोद्वाहसंकटम्' कथा.[१४] प्रो. हरिदत्त शर्मा यांची समाजातील विसंगती यांवर प्रकाश टाकणारी उत्कलिका, लसत्लतिका, नवेक्षिका इ गीतिकाव्ये व गीतसंग्रह,[१५] वधूदहनम् एकांकिका [१६]

माला- विरम, कृष्ण! विरम, मम विकारः परिच्छेदातीतः । तदपि तत्सर्वं श्रावयामि यद्भुतम्। अकस्मादेकदा मदीया- भगिन्याः प्रेमी युवकः एकस्यां बसयानदुर्घटनायां पंचत्वं गतः। तदानीं मम भगिनीगर्भिणी आसीत्। कालस्य कुटिला गतिः। सापि यथाकालं राधां प्रसूय प्रसववेदनापीडाम् असहमाना दिवंगता।

कृष्णः- एवम् ! मातृस्वसः ! मनुष्याः प्रकृत्या स्खलनशीलाः (देवं प्रति पश्यन्) देव ! आत्मानं पश्य। यदा मातृस्वस्रा युवयोः सम्बन्धमंगीकृत्य प्रेमविवाहः कारितः। किं त्वं न स्मरसि? तद्दिनेषु राधा मासद्वयोः गर्भिणी आसीत्। तदा किं तवपुत्रीमुग्धा कुमारी-अम्बायाः सन्ततिर्नास्ति?

देवः - राधे ! क्षन्तव्यो मे अपराधः | मातृस्वसः ! क्षमस्व | मां राधां च मया सह प्रेषय | [१७]

कौशिकः - भ्रातः। यदीत्थमेव स्त्रीगर्भपाताः कारयिष्यन्ते, तच्छीघमेव सृष्टिनाशो भविष्यति। अद्य स्त्रीभ्रूणाः पात्यन्ते वधूनां च हत्याः क्रियन्ते। इदं सर्वं सुदायप्रथाप्रचलनफलम् यत्समाज एव भक्षयति। यदि यौतुकप्रथारोधो न भविष्यति, तदेकस्मिन्दिने नारीभ्रूणविनाशनाद् वधूदाहाच्च नारीजन्मन्यूनता भविष्यति । इत्यं सृष्टिकार्ये बाधा पतिष्यति ।

सारस्वतः - अत्र निवासिनः श्रीसुशीलकुमारगुप्तस्य पुत्रवधूः दग्धा। श्रूयते-सा स्वयं दग्धा। कश्चित्कथयति तस्या दाहः कृतः । कोऽपिकिञ्चित्कथयति, तदन्यस्तदितरं वदति, परश्च तदर निगदति, परं न किमपि ज्ञायते किं सत्यं किमसत्यं वा ?

सारस्वतः- जगदिदमनेकदुःखदमस्ति। येन केनापि वधूरियमदह्यत, तस्मै मृत्युदण्डोऽपि प्रदास्यते कतिपयैरेवाऽहोभिः। ह्यस्तने समाचारपत्रे नवभारते भवता किं नैव पठितम् ? तत्रानेकस्य वधूदाहस्य वार्ता प्रकाशिताऽभूद् यन्नवदेहल्यामेकेन युवकेन पूर्वन्त्वेकया युवत्या सह प्रेम कृतम्। यदा सा गर्भवती बभूव, तदा तस्या हत्या कृता तेन यमुनातीरे प्रेमाऽऽचरता तत्कन्धरामर्धचन्द्राकाराभ्यां हस्ताभ्यां निबध्नता भार्गवमहाभाग ।

भार्गवः- महोदय ! मम गृहे तु हिन्दुस्थानं नाम समाचारपत्रमायाति नवभारतन्तु न। हिन्दुस्थाने तु कर्णपुरस्य समाचारः प्रकाशित आसीत्। तत्रैकेन देवरेण स्वभ्रातृजायया सह पूर्व बलात्कारः कृत; ततः पश्चाच्च हत्या कृता गृह एव तस्या एव कक्षे। तस्मै न्यायालयेन तज्जीवनमवलोकयता दत्त आजीवनकारावासः । [१८]

अशाप्रकारे पी. व्ही. वरदराज शर्मा, पं. मिथिलेश शास्त्री, डॉ. रामकिशोर मिश्र, विश्वेश्वर दयाळ पं. श्रीराम शर्मा आचार्य, जगन्नाथ पाठक, महालिंगशास्त्री, पं. क्षमा राव, राधावल्लभ त्रिपाठी, सत्यव्रत शास्त्री, कपिलदेव द्विवेदी प्रो. हरिदत्त शर्मा, राजेंद्र मिश्र, श्री. भा. वर्णेकर, श्री. यज्ञेश्वर शास्त्री इत्यादी आधुनिक संस्कृत लेखकांनी आपल्या साहित्यकृतींतून स्त्रीविषयक प्रश्नांना गंभीरपणे हात घातला आहे. त्यांच्या लेखनात स्त्रीशिक्षण, आत्मसन्मान, सामाजिक न्याय व समानतेचा आग्रह स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे आधुनिक संस्कृत साहित्य हे स्त्रीविमर्शाचे सशक्त माध्यम ठरले आहे. आधुनिक काळातील स्त्रीविमर्शाचा प्रभाव संस्कृत साहित्यावरही पडलेला दिसतो. स्त्री ही सामाजिक परिवर्तनाची सक्रिय घटक आहे, हा विचार आधुनिक संस्कृत साहित्यात रुजत असलेला दिसत आहे.

**स्त्रीवादी विचारांचा प्रभाव-**

आधुनिक संस्कृत साहित्य भारतीय सामाजिक वास्तवाशी सुसंगत असा स्त्रीवादी दृष्टिकोन मांडते.

**चिकित्सक विश्लेषण-**

आधुनिक संस्कृत लेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन प्रगत असला, तरी काही ठिकाणी परंपरेचा प्रभाव जाणवतो. हे साहित्य संक्रमणकाळाचे प्रतिनिधित्व करते, असे म्हणता येते.

**सामाजिक परिवर्तनात आधुनिक संस्कृत साहित्याची भूमिका-**

स्त्रीविषयक प्रश्नांना वाचा फोडून आधुनिक संस्कृत साहित्याने समाजजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

निष्कर्ष-

वरील विवेचनातून असे स्पष्ट होते की, आधुनिक संस्कृत साहित्यातील स्त्रीप्रतिमा ही बदलत्या सामाजिक वास्तवाचे प्रतीक आहे. स्त्री ही आता केवळ परंपरेची वाहक नसून परिवर्तनाचा सक्रिय घटक बनलेली आहे. आधुनिक संस्कृत लेखकांनी स्त्रीच्या प्रश्नांना साहित्याच्या केंद्रस्थानी आणून समाजाला आत्मपरीक्षणास प्रवृत्त केले आहे. आधुनिक संस्कृत लेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन प्रगत, मानवतावादी व समतावादी आहे. पारंपरिक दृष्टीकोणाला बगल देऊन स्त्रीला स्वतंत्र, सक्षम व आत्मसन्मानपूर्ण व्यक्ती म्हणून सादर करण्याचा प्रयत्न आधुनिक संस्कृत साहित्यात झाला आहे. स्त्रीशिक्षण, स्वातंत्र्य, समानता व सामाजिक न्याय यांचे प्रतिबिंब या साहित्यात आढळते. त्यामुळे आधुनिक संस्कृत साहित्य हे स्त्रीविषयक जागृतीचे प्रभावी माध्यम आहे, असे ठामपणे म्हणता येईल.

**संशोधनाच्या मर्यादा-**

१. आधुनिक संस्कृत लेखकांचा सविस्तर अभ्यास शक्य झाला नाही.

२. आधुनिक संस्कृत लेखकांची ग्रंथसंपदा उपलब्ध झाली नाही.

२. उपलब्ध साहित्य व संदर्भग्रंथांच्या आधारे निष्कर्ष मांडले आहेत.

**संदर्भसूची-**

१. आधुनिक संस्कृत साहित्य एवं साहित्यकार, पान नं. १०
२. अर्वाचीन संस्कृत साहित्य, पान नं. ४११
३. लघुसिद्धांत कौमुदी आणि वैदिक वाङमयाचा इतिहास, पान नं. १७३
४. अर्वाचीन संस्कृत साहित्य, पान नं. ५०९
५. आधुनिक संस्कृत साहित्य एवं साहित्यकार, पान नं. ५७
६. आधुनिक संस्कृत साहित्य एवं साहित्यकार, पान नं. १६४
७. अर्वाचीन संस्कृत विभूतिकाव्य, पान नं. ११७
८. संस्कृत नाट्य:प्रस्तुति पक्ष, पान नं.९०
९. अर्वाचीन संस्कृत साहित्य, पान नं. ३४६
१०.तत्रैव, पान नं. ४१५
११.अर्वाचीन संस्कृत विभूतिकाव्य, पान नं. २०२
१२.अर्वाचीन संस्कृत साहित्य, पान नं. ५०८.
१३.ललित संस्कृत साहित्याला महाराष्ट्राचे योगदान, पान नं. १८८
१४.तत्रैव, पान नं. १६७
१५.आधुनिक संस्कृत साहित्य एवं साहित्यकार, पान नं. ९९, १००
१६.तत्रैव, पान नं. १४९
१७.कुमार्यम्बा, पान नं. १४

१८.संस्कृत चंद्रिका, पान नं. २४, २५, २६, २७

**संदर्भग्रंथ सूची -**


१. आचार्य हरिराम, संस्कृत नाट्य: प्रस्तुति पक्ष,जवाहर कला केंद्र, जयपूर, २००५

२. दलाल शुचिता, अर्वाचीन संस्कृत विभूतिकाव्य, विश्वभारती प्रकाशन सीतबर्डी, नागपूर प्रथमावृत्ती, २००५

३. त्रिपाठी राधावल्लभ, आधुनिक संस्कृत साहित्य का इतिहास, चौखंबा संस्कृत सीरिज ऑफिस, वाराणसी

४. मराठे हंसश्री, ललित संस्कृत साहित्याला महाराष्ट्राचे योगदान, श्री मंगेश प्रकाशन ,नागपूर

५. मिश्र अभिराज राजेन्द्र, आधुनिक संस्कृत नाटक, वैजयंत प्रकाशन, इलाहाबाद

६. वर्णेकर श्री. भा., अर्वाचीन संस्कृत साहित्य, मॉडर्न बुक स्टोअर्स, नागपूर १९६३

७. शर्मा मिथिलेश, कुमार्यम्बा, विकास प्रिंट्स अँड ग्राफिक्स, हिसार प्रथमावृत्ती, २०१५

८. जाधव एस. के. (संपा.), संस्कृत चंद्रिका, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २०१३

९. https://www.uprtou.ac.in, आधुनिक संस्कृत साहित्य एवं साहित्यकार,